**प्राथमिक शिक्षण संचालनालय**
डॉ. ॲनी बेझंट मार्ग, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

दूरध्वनी (०२०)२६१२१३९४/९६ फॅक्स (०२०)२६१२५८७४
शिससं(०२०-२६१२५८७४) शिउसं (०२०-२६१३४६७२)

---

शिक्षण संचालनालय (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे-१. 26 02 2013 ८४८ जावक क्रमांक ५०७ शाखा

क्रमांक प्राशिसं/२०१३/संकिर्ण/८४८
दिनांक :- १३/२/२०१३
26 FEB 2013

प्रति,
शिक्षणाधिकारी सर्व,
शिक्षण उपसंचालक सर्व

**विषय :- राज्यातील सर्व प्राथमिक/माध्यमिक शाळांमध्ये मित्र उपक्रम कार्यान्वीत करणे**

शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०११/२९६/११/माशि-३ दि.५ ऑक्टोबर २०११. संकिर्ण २०११ व शासन परिपत्रक क्र. (२९६/११)/माशि-३ दि. २७ जानेवारी २०१२ नुसार राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमधून आनापान ध्यान साधना प्रशिक्षण वर्ग (मित्र उपक्रम)कार्यान्वीत करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

मित्र उपक्रम राज्यातील इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या मानसिक व बौध्दिक वाढीकरिता उपयुक्त ठरणार असल्याने सदर उपक्रम महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय शाळा व अनुदानित शाळा, अध्यापक विद्यालये व महाविद्यालये तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व आदिवासी विकास विभागांतर्गत येणाऱ्या शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा व वसतिगृहे इत्यादीमध्ये कार्यान्वीत करावा असे शासनाचे निर्देश आहेत. सदर उपक्रमाची अंमलबजावणी करण्याकरिता उपरोक्त शासन परिपत्रकान्वये राज्य, जिल्हा, तालुका व शाळा स्तरावर समित्या गठित करण्यात आल्या आहेत व समित्यांची कामेसुध्दा नमूद करण्यात आली आहेत.

त्याप्रमाणे शासन परिपत्रक क्र. २०११(२९६/११)/माशि-३ दि. २७ जानेवारी २०१२ द्वारा गठित समित्यांनी शासन परिपत्रक दिनांक २७/१/२०१२ अन्वये निर्देश दिल्याप्रमाणे मित्र उपक्रम कार्यान्वीत करण्याबाबत कार्यवाही करावी व अनुपालन सादर करावे.

**(महावीर माने)**
शिक्षण संचालक (प्राथमिक)
महाराष्ट्र राज्य, पुणे १

प्रत कार्यवाहीसाठी -
१. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (सर्व)
२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद (सर्व)
३. शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी, महानगरपालिका, नगरपालिका (सर्व)

प्रत -
१. शिक्षण संचालक MSCERT शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १
२. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. डॉ. पी.एस.मीना, अतिरिक्त मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई - ३२
४. विपश्यना रिसर्च इन्स्टिट्यूट / विपश्यना इंटरनॅशनल अकॅडमी, धम्मगिरी, इगतपुरी